# आदिवासी समुदायावर आधुनिक समाजाच्या प्रभावामुळे झालेले सामाजिक परिवर्तन

**डॉ. नितीन सुरेशराव कायरकर**
समाजशास्त्र विभाग
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. अनुराधा खाडे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय, लाखणी

**सारांश**

'भारतीय आदिवासी' हा स्वातंत्र्योत्तर काळात अनेकांच्या आकर्षणाचा विषय झाला आहे. उदा. भारतात येणारे हौशी पर्यटक आदिवासी क्षेत्राला आवर्जून भेट देतात. आदिवासी लोककलांच्या महोत्सवी कार्यक्रमात हौशी पर्यटकांची उपस्थिती लक्षणीय प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येते. केवळ आदिवासी लोकगीतांचेच नव्हे तर त्यांच्या चालींचेही अध्ययन मोठ्या प्रमाणात झाले आहे व होत आहे. सामाजिक शास्त्रांचे संशोधक-अभ्यासक देखील याला अपवाद नाहीत. भारतीय आदिवासींच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय जीवनाशी निगडित विभिन्न प्रश्नांवर यापूर्वी कधीही नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणात संशोधन- अध्ययने झाली असल्याचे दिसून येते परंतु आधुनिक समाजाच्या संगतीने या आदिवासी समुदायात बऱ्याच प्रमाणात सामाजिक परिवर्तन झालेले दिसून येते, अशाप्रकारे आदिवासी जमातींची यथार्थ ओळख करून घेण्यासाठी त्यांचे सामाजिक अध्ययन करने अत्यंत महत्वाचे आहे, प्रस्तुत निबंधा त्यांच्यात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

**ब्रिजशब्द सूची**: आदिवासी समुदाय, जनजाती, सामाजिक परिवर्तन, 'समूह', समुदाय,

**संशोधनाचा उद्देश**

भारतीय आदिवासींच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय जीवनात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनामध्ये दुय्यम साधनांचा वापर केलेला असून पुस्तके, लेख, मासिक यातील माहितीचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्रस्तावना**

भारतात लहान लहान आकाराच्या २०० पेक्षाही जास्त आदिवासी जमाती आहेत. काही आदिवासी जमातींचा अद्यापही नागरी व ग्रामीण जीवनाशी फारसा संबंधच आला नाही. परिणामी अद्यापही अनेक आदिवासी जमात प्राथमिक अवस्थेत जीवन जगत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासी समुदायाला अनुसूचित जमाती, अशी संज्ञा मिळाली.परंतु ज्यांचा यांच्याशी संबध आला त्यांच्यात बऱ्याच प्रमाणात परिवर्तन झालेले दिसून येते या परिवर्तीत झालेल्या आदिवासी जमातींचे शास्त्रशुद्ध अध्ययन झाल्याशिवाय या जमातींची खऱ्या अर्थाने आपणास ओळखच होऊ शकत नाही असे म्हणता येईल. त्यांचे सर्वांगीण अध्ययन झाल्याशिवाय त्यांच्यामधील चालीरीती, प्रथांचा अर्थच समजणे शक्य नाही.

आदिवासी जीवनपद्धतींच्या विभिन्न पैलूंचे अध्ययन सामाजिक शास्त्रांमध्ये केले जाते. आदिवासी जमातीचा जनजाती कुटुंबाचा, कुटुंब समुहाचे एक संकलन समृद्ध आहे. आदिवासी जमातीला विशिष्ट नाव, भाषा, संस्कृती, एक समाज, एक प्रथा असलेले दिसून येते. आदिवासीचे विशेष महत्वाचे लक्षण म्हणजे ते एका विशिष्ट भु-भागावर वास्तव्य करतात

**आदिवासी समाजाच्या व्याख्या**

डॉ. रिव्हर्स – जनजाती म्हणजे एक सामाजिक 'समूह' उपजाती एक भाषा, एक उद्दिष्ट ठेवून संघटीत रीतीने कार्य करतात.

डॉ. मुजुमदार - आदिवासी समुदायात म्हणजे नातेदारीने संबधित असणाऱ्या अनेक कुटुंबांचा असा समुच्चय होय की ज्याचे एक सामान्य नाव, बोलीभाषा, सामान्य भुभाग असते, आदिवासी समुदायातील सभासद विवाहाच्या व व्यवसायाच्या बाबतीत अनेक निर्बंध पाळतो. परस्परांविषयी कर्तव्याशी जाणीव असते.

भारतीय समुदाय विविधतेने नटलेला आहे. पृथ्वीतलावर मानवाची निर्मिती झाली तेव्हापासून प्रजाच्या अनेक भागामध्ये अनेक मानव गटांनी वास्तव्य केले. राहत असताना जगण्यासाठी अनेक नैसर्गिक संपत्तीचा वापर केला. वस्तू तयार केल्या, संपत्तीसाठी अनेक भाषा विकसित झाल्या, मानवाने अनेक परंपरा, रुढी निर्माण केल्या आणि त्यातून मानवाच्या विशिष्ट संस्कृतीशी निर्मिती झाली. सर्व मानव समाज संस्कृतीची निर्मिती अत्यंत महत्वाचे असतात. अशीच वैविध्यपूर्ण संस्कृति आदिवासी समुदायाची आहे. सुरुवातीला आदिवासी समुदायातील लोक हे डोंगराळ भागात राहणे, इतर समाजाशी

संपर्क नसणे, शहरांशी संबंध नसणे त्यामुळे आधुनिक साधनापासून ते अलिप्त होते, व निसर्गमय जीवन जगत, परंतु प्रगत समाजासोबत जवळचा संबंध आल्यापासून या समुदायात सामाजिक परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

**आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तन:**

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. त्यात आदिवासी समुदायात सुद्धा कालानुरूप परिवर्तन घडून आलेले दिसून येते. आदिवासी समुदाय हा मुख्यत: निसर्गा सोबत राहात असे. त्यामुळे त्यांचा इतर प्रगत समाजाशी कुठलाही संबंध येत नसे. त्यामुळे आदिवासीच्या प्रथा, परंपरा, संस्कृती, खानपान, राहणीमान यामध्ये बदल झाला नाही. ते आपल्या संस्कृती सोबत एकनिष्ठ राहिले. त्यांनी समाजात एकोपा टिकून राहिला.

भारतामध्ये ब्रिटिश आगमनानंतर जंगलावर सरकारी अधिकार प्रस्थापित झाला आणि आदिवासींच्या आधिकारावर गदा यायला सुरुवात झाली. वनधोरण, जमिनकायदे, यामुळे त्यांच्या मूळ गोष्टींमध्ये परिवर्तन सुरु झाले. जमिनदार, व्यापारी, ठेकेदार यांच्या संपर्कामुळे त्यांचा प्रभाव या समुदायावर पडायला सुरुवात झाली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मात्र आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. त्यामधुन आदिवासी समाजात अनेक परिवर्तन घडून आलेले दिसून येते.

आदिवासी समुदायात संरचनात्मक व प्रकार्यात्मक परिवर्तन घडून आलेले दिसून येते. आदिवासी समुदाय आधुनिक समाजाशी साधर्म्य साधत आहे.

**१. आदिवासीमधील शैक्षणिक परिवर्तन**: भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर आदिवासी समुदायाच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शैक्षणिक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. आरक्षण, घटनात्मक तरतुदींच्या आधारे आदिवासींचा विकास घडून आलेला दिसून येतो. आदिवासींचे व्यावसायिक क्षेत्रात सुद्धा योगदान वाढायला सुरुवात झाली. आदिवासींमधील शिक्षित वर्ग सरकारी सुविधांचा लाभ घेवू लागला. शिक्षणामुळे समुदायात जागृतता आली आणि एक सुशिक्षित आदिवासी वर्ग समाजामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडवून आणत असलेला दिसून येते.

**२. आर्थिक परिवर्तन**: आदिवासी समुदायात आर्थिक समस्या सर्वात मोठ्या प्रमाणात दिसून येत होत्या. आदिवासी समुदाय स्थलांतरीत शेती करीत असल्यामुळे त्यातून अत्यंत कमी उत्पादन होत असे त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह करणे कठीण जात असे. आज आदिवासींनी नविन तंत्रज्ञानाचा वापर करून स्थीर शेती करायला सुरुवात केली. आदिवासी उदर निर्वाहापुरते उत्पादन न करता विक्रीसाठी उत्पादन करू लागले, अनेक आदिवासी हस्तकलेच्या वस्तु निर्मिती करीत आहे त्या वस्तुंना विदेशातून मागणी वाढत आहे. शेतीसोबत जोडव्यवसाय म्हणून कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय सुरु केल्यामुळे आदिवासी उत्पादनात वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे त्यांचे आर्थिक दृष्ट्या परिवर्तन झालेले दिसून येते.

**३. धर्म संस्थेमधील परिवर्तन:** आदिवासीची संस्कृति वैविध्यपूर्ण असलेली दिसून येते परंतु देशामध्ये धर्मप्रसाराला आलेल्या अनेक विदेशी - प्रसारकांनी आदिवासी भागामध्ये धर्मप्रसाराचे कार्य केलेले दिसून येते. खिश्चन मिशनरीज भारतात आल्यानंतर त्यांनी आदिवासी भागामध्ये शिक्षण प्रसाराला सुरुवात केली व त्यातूनच आदिवासींमध्ये धर्मपरिवर्तन सुद्धा घडवून आणलेले दिसून येते. आदिवासींची पारंपारिक जीवनपद्धती मागे पडली आणि ते नवीन जीवनपद्धतीला लागले. नविन धर्माच्या संपर्कात येवून नविन आचार विचार शिकायला सुरुवात झाली आणि आदिवासींच्या मूळ संस्कृतीचा ती मात्र काही प्रमाणात लोप व्हायला सुरुवात झाली.

**४. कुटुंब संस्थेमार्फत परिवर्तन**: आदिवासी समुदायामध्ये संयुक्त कुटुंब व्यवस्था ही - अत्यंत महत्वाची होती आज आधुनिक समाजाच्या संपर्कामुळे विभक्त कुटुंबाकडे वाटचाल होताना दिसून येतो. प्रगत समाजाशी संपर्क, कामासाठी दुसऱ्या प्रदेशात स्थलांतरण यामुळे कुटुंबाच्या आकारामध्ये घट झालेली दिसून येते. आदिवासी शहरामध्ये राहायला सुरुवात झाल्यामुळे त्यांच्यामध्ये केंद्र कुटुंबाची संख्या वाढायला सुरुवात झाली. अनेक आदिवासी जमातीमध्ये मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन होवून पितृसत्ताक कुटुंब पद्धती वाढत असलेली दिसून येते. आधुनिक कालखंडामध्ये नविन प्रवाहाचा प्रभाव होवून आदिवासी समुदायाच्या अनेक जुन्या प्रथा, परंपरा, कुटुंब व्यवस्थेमध्ये परिवर्तन आलेले दिसून येते.

**५. विवाह संस्थेमधील परिवर्तन**: आदिवासीमध्ये बाह्य संपर्कामुळे विवाह - संस्थेमध्येसुद्धा बदल झालेला दिसून येतो. पलायन विवाह, अपहरण विवाह अशा अनेक प्रथा संपुष्टात आल्या. कमार व लैगा जमातीमधील वैणू विवाह पद्धतीचा त्याग केलेला दिसून येतो. आदिवासींनी अनेक नविन विधिंचा विवाहामध्ये स्वीकार केलेला दिसून येतो. आदिवासींमध्ये बालविवाह, प्रेमविवाह, विवाहामध्ये माता पितत्याला महत्वाचे स्थान हे हिंदू धर्माच्या संपर्कामुळे या प्रथा निर्माण झालेल्या दिसून येतात. आज आदिवासी समुदायात विधी, मुहुर्त पहायला सुरुवात झालेली दिसून येते.

**६. राजकीय परिवर्तन:** आदिवासी समुदायामध्ये सुरुवातीपासून स्वतःचे काही - नियम होते त्यानुसार ते आपले राजकीय कार्य करीत असे परंतु आधुनिक समाजातील पंचायत राजव्यवस्थेचा त्यांच्यावर परिणाम झालेला दिसून येतो. तरीसुद्धा आदीवासीमध्ये अजुनही जात पंचायत करत असलेली दिसून येते. वेगळ्या राजकीय पक्षामध्ये आदिवासी समुदाय काम करतात. तसेच न्यायव्यवस्था, आरक्षित जागावरील प्रतिनिधित्व इ गोष्टी आदीवासींना माहित व्हायला सुरुवात झाली. देशातील लोकशाही व्यवस्थेची संपूर्ण माहिती व सहभाग आदिवासींचा होत असलेला दिसून येते.

**७. सांस्कृतिक परिवर्तन:** आदिवासी समुदायाचे स्वतंत्र अशी संस्कृती आहे, आदिवासींच्या रुढी, परंपरा आहे. आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगून ते त्यात परिवर्तन होवू देत नसे परंतु आधुनिक समाजाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या संस्कृतीत परिवर्तन झालेले दिसून येते. आदिवासीना सुरुवातीला युवागृहाची संकल्पना मान्य होती परंतु आज आदिवासी युवक या संकल्पनेला मान्य करीत नाही, तसेच आदिवासी नृत्य, लोकगीते, यांच्यातसुद्धा बदल झालेला दिसून येतो. आदिवासींमध्ये आधुनिक सिनेमा, संगीत करमणुकीचे साधन झालेले दिसून येते.

**८. आदिवासी स्त्रियांमधील परिवर्तन:** आदिवासी समुदायाचा प्रगत समाजाशी संपर्क याच्या अगोदर स्त्रीयांना समान अधिकार होते. स्त्री पुरुष लिंगभाव प्रमाण सारखे होते. स्त्रीयांना सर्व क्षेत्रात अधिकार होते. स्त्रीयांना घटस्फोटाचा अधिकार होता विधवा पुनर्विवाहाची परवानगी होती. विवाह योग्य वयात केल्या जायचे. इ स्त्रीयांना अधिकार होते. परंतु नविन लोकांच्या संपर्कामुळे यांच्या अधिकारावर नियंत्रण यायला सुरुवात झाली. घटस्फोट, विधवा पुनर्विवाहावर बरेच बंधने आली त्यामुळे आदीम स्त्रीयांची आत्मनिर्भरता कमी होवू लागली.

**संदर्भ ग्रंथ:**

सुधाकर जाधव,(२०१२),भारतातील आदिवासी समाज, सह्याद्री बुक्स प्रकाशन, पुणे

रमेश चंद मिना,(२०२०),आदिवासी लोक और संस्कृति, साहित्य संस्थान, गाझियाबाद

संजय साळीवकर,(२०१४),भारतीय आदिवासी जीवन आणि संस्कृती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

केदार प्रसाद मीणा,(२०१६)आदिवासी समाज, साहित्य और राजनीति,अनुज्ञा बुक्स, दिल्ली.

रा. ज. लोटे, (२००४),आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर

दि. प. लाखनीकर,(२००४)भारतीय आदिवासीचे समाजशास्त्र, प्रशांत प्रिंटर्स प्रकाशन, भंडारा